दैनिक
# लोक आरंभ
wwww.lokaarambh.com
संपादक: राहुल मारोतीराव वाईकर
LOK AARAMBH
dainiklokaarambh@gmail.com
बीड | वर्ष - ०४ थे | अंक ४९ | मंगळवार ३ फेब्रुवारी २०२६ | RNI/MAHMAR/2022/84215 Postal No LSB/Beed/RNP-270/2026-2028 | पान ४ | किंमत २ रु
Beed | year - ०4 th | Issue 49 | Tuesday3 February 2026 | RNI/MAHMAR/2022/84215 Postal No LSB/Beed/RNP-270/2026-2028 | Page 4 | Price 2

# अमेरिकेचा मोठा निर्णय, देवेंद्र फडणवीसांची थेट पोस्ट

मागील काही दिवसांपासून अमेरिका भारतावर अनेक निर्बंध लादताना दिसली. भारत रशियाकडून तेल खरेदी करत असल्याने भारतावर तब्बल 50 टक्के टॅरिफ लावला. ज्यानंतर भारतातून अमेरिकेत होणारी निर्यात कमी झाली. भारताने रशियाकडून तेल खरेदी जवळपास थांबवली आहे. मात्र, यानंतर अमेरिका भारतावरील टॅरिफ कधी कमी करणार असा प्रश्न सातत्याने उपस्थित केला जात होता. या टॅरिफच्या मुद्द्यात भारत आणि अमेरिकेत व्यापार करार होऊ शकत नव्हते. अखेर अमेरिकेने थेट भारतावरील टॅरिफ कमी केला. भारत आणि अमेरिकेत नक्की काय मैत्री आहे हे पुन्हा एकदा जगाला दाखवून दिले. भारत आणि अमेरिकेचे संबंध टॅरिफमुळे तणावात असताना पाकिस्तानने थेट याचा फायदा घेत अमेरिकेसोबत मैत्री वाढवण्याचा प्रयत्न केला. शिवाय भारतावर अमेरिकेने लावलेल्या मोठ्या टॅरिफच्या विरोधात चीन देखील मैदानात आला होता. चीनने या टॅरिफला विरोध केला. डोनाल्ड ट्रम्प यांनी मोठी घोषणा केली असून 50 टक्के टॅरिफ थेट 18 टक्क्यांवर आणला. हा अत्यंत मोठा दिलासा भारतीय व्यापाऱ्यांना मिळाला. 50 टक्के टॅरिफ भारतीय वस्तूंवर लावल्याने भारतातून अमेरिकेत वस्तू पाठवणे कठीण झाले होते. यादरम्यान भारताने अनेक देशांसोबत महत्वाचे व्यापार करार केले. शेवटी भारतावरील टॅरिफ कमी करण्याचा मोठा निर्णय अमेरिकेने घेतला. अमेरिकेने भारतावर टॅरिफ कमी केल्यानंतर राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोशल मीडियावर एक खास पोस्ट शेअर केली.

मैत्रीचा नवीन अध्याय



म्हणत त्यांनी ही पोस्ट शेअर केली. देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या पोस्टमध्ये म्हटले की, भारत आणि अमेरिकेमधील ऐतिहासिक व्यापार करार हा खऱ्या अर्थाने पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या मैत्रीचा विजय आहे.जागतिक व्यापारासाठी सुद्धा हा एक अत्यंत महत्त्वपूर्ण क्षण आहे. जगातील प्रमुख निर्यात करणाऱ्या अर्थव्यवस्थांमध्ये भारताला आता अमेरिकेकडून प्राधान्य टॅरिफ दर मिळणार आहे. यातून भारत अमेरिका मैत्रीच्या नव्या युगाची सुरुवात झाली आहे. हा करार भारतीय व्यावसायिकांसाठी अनेक नूतन आणि उत्साहवर्धक संधींचे द्वार खुले करेल आणि ही दोन्ही देशांसाठी फायदेशीर अशी बाब ठरेल. महाराष्ट्र हे कायम निर्यातीत अग्रेसर असलेले राज्य आहे. त्यामुळे हा करार आपल्या राज्यातील व्यवसायासाठी नवीन क्षितिज खुले करेल. डेटा सेंटर्स, आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि क्रांतिकारी आधुनिक तंत्रज्ञानामध्ये महाराष्ट्राला मोठी गुंतवणूक प्राप्त होईल, असे देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या पोस्टमध्ये म्हटले आहे.

## मैत्रीचा एक नवीन अध्याय!

भारत आणि अमेरिकेमधील ऐतिहासिक व्यापार करार हा खऱ्या अर्थाने मा. पंतप्रधान नरेंद्र मोदीजी आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या मैत्रीचा विजय आहे. जागतिक व्यापारासाठी सुद्धा हा एक अत्यंत महत्त्वपूर्ण क्षण आहे.जगातील प्रमुख निर्यात करणाऱ्या अर्थव्यवस्थांमध्ये भारताला आता अमेरिकेकडून प्राधान्य टॅरिफ दर मिळणार आहे. यातून भारत-अमेरिका मैत्रीच्या नव्या युगाची सुरुवात झाली आहे.हा करार भारतीय व्यावसायिकांसाठी अनेक नूतन आणि उत्साहवर्धक संधींचे द्वार खुले करेल आणि ही दोन्ही देशांसाठी फायदेशीर अशी बाब ठरेल.
महाराष्ट्र हे कायम निर्यातीत अग्रेसर असलेले राज्य आहे. त्यामुळे हा करार आपल्या राज्यातील व्यवसायासाठी नवे क्षितिज खुले करेल. डेटा सेंटर्स, आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि क्रांतिकारी आधुनिक तंत्रज्ञानामध्ये महाराष्ट्राला मोठी गुंतवणूक प्राप्त होईल.

# राष्ट्रवादी विलगीकरणाबाबत राज्यातील बड्या नेत्याचा अत्यंत मोठा दावा

पमुख्यमंत्री अजित पवार मुंबईहून बारामतीला जात असताना त्यांच्या विमानाचा मोठा अपघात झाला. या अपघातात अजित पवार यांचे निधन झाले. बारामती विमानतळाच्या अगदी लगत हा अपघात झाला. विमान अपघात इतका जास्त भीषण होता की, एकही व्यक्ती या अपघातातून वाचू शकली नाही. अनेकांनी अजित पवार यांच्या विमान अपघातानंतर संशयही व्यक्त केला. विमान कोसळण्याच्या काही सेकंद अगोदर नेमके काय घडले हे व्हायरल होणाऱ्या व्हिडीओमधून स्पष्ट झाले. अजित पवार यांचे विमान आकाशातच एका बाजूला झुकल्याचे स्पष्ट दिसले. अजित पवार यांच्या निधनाने मोठी खळबळ उडाली. अजित पवार यांच्या निधनानंतर सुनेत्रा पवार यांनी अवघ्या काही तासात उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेण्यासाठी घाई केल्याचे अनेकांनी म्हटले. कारण सुनेत्रा पवार यांनी शरद पवार किंवा सुप्रिया सुळे यांच्यासोबत कोणतीही चर्चा न करता उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. सुनेत्रा पवार उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेणार असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर शरद पवार यांनी एक पत्रकार परिषद घेत स्पष्ट सांगितले की, मला या शपथविधीबद्दल काहीच माहिती नाही किंवा सुनेत्रा पवार शपथ घेणार की नाही हे पण माहिती नाही. सुनेत्रा पवार यांनी याबद्दल कोणतीही चर्चा केली नाही. यादरम्यान शरद पवार यांनी एक महत्वाचा मुद्दा मांडला की, दोन्ही राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष एकत्र येणार होते, त्याबद्दलची घोषणा 12 फेब्रुवारीला होणार होती. पण आता यात खंड पडला. जयंत पाटील आणि अजित पवार यांच्यात चर्चा सुरू होती. मात्र, यानंतर अजित पवार गटाच्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या नेत्यांनी याला नकार दिला. असे काही असते तर अजित पवार यांनी आमच्यासोबत चर्चा केली असती असे थेट अनेकांनी म्हटले, त्यामध्येच आता अजून एका राज्यातील मोठ्या नेत्याने थेट दावा केला.
दोन्ही राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष एकत्र येणार होती आणि याकरिता पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांनी ग्रीन सिग्नल दिला होता, असा थेट दावा केला. हेच नाही तर राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाच्या नेत्याने म्हटले की, सुप्रिया सुळे केंद्रात, अजित पवार राज्यात आणि प्रदेशाध्यक्ष म्हणून अमोल कोल्हे यांची निवड केली जाणार होती, असाही दावा करण्यात आला.

# चंपावती महोत्सवाची दणक्यात सुरुवात; चित्रकला स्पर्धेला हजारो बालकलाकारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद!

## अनिल दादा जगताप यांच्या बालकलाकारांचे विशेष कौतुक!

बीड, प्रतिनिधी- अनिल दादा जगताप फाउंडेशन बीड व शिवसेना बीड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे महाकरंडक २०२६ अंतर्गत पहिलीच चित्रकला स्पर्धा प्रचंड उत्साहात व बालकलाकारांच्या भरगच्च सहभागात पार पडली. या चित्रकला स्पर्धेत बीड जिल्ह्यातील गेवराई, माजलगाव, परळी, अंबाजोगाई, केज, वडवणी, आष्टी, पाटोदा व बीड तालुक्यातील ग्रामीण भागातील गावखेड्यांमधून मराठी आणि इंग्रजी माध्यमाच्या तब्बल 187 शाळांमधील हजारो विद्यार्थी सहभागी झाले होते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा एवढा मोठा सहभाग हे चंपावती महोत्सवाचे यश अधोरेखित करणारे ठरले.

वयोगट इयत्ता पहिली ते तिसरी छोटा भीम या कार्टूनचे चित्र, वयोगट इयत्ता चौथी ते सहावी घोडा या प्राण्याचे चित्र, वयोगट इयत्ता सातवी ते दहावी शिवसेनाप्रमुख हिंदुहृदयसम्राट स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांचे चित्र विद्यार्थ्यांनी अत्यंत कल्पकता, रंगसंगती आणि कलात्मकतेचा सुरेख संगम साधत आपापल्या चित्रांमधून अनोखा चित्रकलाविष्कार सादर केला. विशेषतः सातवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी रेखाटलेल्या स्व बाळासाहेब ठाकरे यांच्या चित्रांमध्ये जिवंतपणा व भावभावना दिसून आल्या. तर लहान गटातील विद्यार्थ्यांनी छोटा भीम आणि घोडा या चित्रांमधून आपल्या कल्पनाशक्तीचा सुंदर आविष्कार घडवला.



सलग चौथ्या वर्षी सुरू असलेल्या चंपावती महोत्सवातील पहिल्याच स्पर्धेला मिळालेला हा उत्स्फूर्त प्रतिसाद लक्षवेधी ठरला आहे. यानिमित्ताने शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप यांनी सर्व शाळांचे संस्थाचालक, मुख्याध्यापक, शिक्षक व पालकांचे आभार मानत बालकलाकारांचे विशेष कौतुक करून त्यांचे अभिनंदन केले. कालपासून खऱ्या अर्थाने चंपावती महोत्सवाचा प्रारंभ झाला असून, चित्रकला स्पर्धेनंतर दि. ३ फेब्रुवारी रोजी प्रत्येक शाळेत रांगोळी स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेत सर्व विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन अनिल दादा जगताप फाउंडेशनचे सचिव आकाश भैया जगताप व चंपावती महोत्सवाचे संस्थापक अध्यक्ष प्रतिक कांबळे यांनी केले आहे. बालकलाकारांना व्यासपीठ देणारा, ग्रामीण भागातील कला पुढे आणणारा आणि संपूर्ण बीड जिल्ह्याच्या सांस्कृतिक चळवळीचा मानबिंदू ठरलेला चंपावती महोत्सव पुन्हा एकदा जिल्ह्यातील कला, संस्कार आणि सर्जनशीलतेचे केंद्रबिंदू ठरत असल्याचे या स्पर्धेतून स्पष्ट झाले आहे.

## स्व. बाळासाहेब ठाकरे चित्रांतून जिवंत झाले!

चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे महा करंडकातील पहिल्याच चित्रकला स्पर्धेतील सातवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी शिवसेनाप्रमुख हिंदुहृदयसम्राट स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांची चित्रे रेखाटताना विलक्षण कौशल्य दाखवले. विद्यार्थ्यांच्या रेषा, रंगसंगती आणि भावभावना यामुळे बाळासाहेबांचे व्यक्तिमत्त्व चित्रांतून जिवंत झाल्याचा अनुभव उपस्थितांना आला. डोळ्यांतील करारी भाव, चेहऱ्यावरील आत्मविश्वास आणि नेत्रदीपक सादरीकरणाने ही चित्रे लक्षवेधी ठरली. बालवयातच बाळासाहेबांच्या विचारांशी असलेली नाळ या चित्रांतून प्रकर्षाने दिसून शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप यांनी सर्व बालकलाकारांचे विशेष कौतुक केले.

# ऑनलाइन अबॅकस सर्वोत्कृष्ट यशस्वी विद्यार्थी साईश कैलास घोलपची राष्ट्रीय अबॅकस चॅम्पियनशिपसाठी निवड

बीड (प्रतिनिधी) गणितामधील सखोल माहिती देण्यासाठी आणि अबॅकस मधील सर्वोत्कृष्ट विश्वासपात्र सेंटर म्हणजे एम सी पी आय अबॅकस आणि वैदिक मॅथ स्टडी सेंटर असून विद्यार्थ्यांची तयारी करण्यासाठी अबॅकसला अतिशय महत्त्व प्राप्त झाले आहे. शालेय स्तरावरील सर्वांगिन विकास करण्याच्या मार्गाने अबॅकस गणितीय पध्दतीचा उपयोग होत असून शहरातील अबॅकस ट्रेनिंग केंद्राद्वारे, आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय , राज्य स्तरावर, अबॅकस चॅम्पियनशिप आयोजित केल्या जातात. दिनांक 18 डिसेंबर 2025 मध्ये झालेल्या पहिल्या स्तरावरील अबॅकस परीक्षेमध्ये साईश कैलास घोलपने ऐतिहासिक यश संपादन केलेले आहे. साईश कैलास घोलपने फक्त काही मिनिटांमध्ये सर्व प्रश्न सोडवल्यामुळे
सर्वोत्कृष्ट द्वितीय चॅम्पियनशिप-चॅम्पियन निवड झाली असून शहरातील प्रतिष्ठित व्यक्तींद्वारे सत्कार करण्यात आलेला असून 18 मे 2026 महिन्यामध्ये होणाऱ्या राष्ट्रीय स्तरावरील अबॅकस चॅम्पियनशिपसाठी साईश कैलास घोलपची निवड करण्यात आलेली आहे.




राष्ट्रीय अबॅकस चॅम्पियनशिप स्पर्धेमध्ये भारतातील महाराष्ट्र, दिल्ली, कर्नाटक, आंध्र प्रदेश, ओरिसा, गुजरात, केरळ अशा 11 राज्यातील 1500 एकूण विद्यार्थ्यांपैकी सहभाग घेणाऱ्या यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये साईश कैलास घोलपची राष्ट्रीय स्तरावर निवड झालेली आहे. राष्ट्रीय अबॅकस स्पर्धेमध्ये ब्रेन किड्स स्तरावरील प्रतिष्ठित समजले जाणारी तसेच अबॅकस इंटरनॅशनल सर्वोत्कृष्ट जागतिक विद्यार्थ्यांचे प्रथम यशस्वी विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभाच्या कार्यक्रमांमध्ये अबॅकस मास्टर ट्रेनर डॉ घोडके एस ए यांनी साईश कैलास घोलपला गेल्या चार ते पाच महिन्यापासून सतत प्रयत्न केल्यामुळे यश मिळालेले आहे असे प्रतिपादन केले तसेच अबॅकस तंत्रामुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होतो आणि बुद्धिमत्तेचा सर्वोत्कृष्ट विकास होतो असे साईशच्या वडिलांनी यशस्वी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले आहे असे जिल्हा अबॅकस वितरक एस. ए. घोडके यांनी सांगितले.

शालेय विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास तसेच विद्यार्थ्यांचा गणितामधील आवड निर्माण होऊन गणिताबद्दलची मनात असलेली भीती नष्ट होऊन अनेक क्लिष्ट अशा गणितीय पद्धती सोप्या पद्धतीने सोडवल्यासाठी विद्यार्थ्यांना आत्मविश्वास, स्मरणशक्ती यांचा विकास करण्यासाठी अबॅकसचा उपयोग केला जातो असे जिल्हा अबॅकस वितरक घोडके एस ए यांनी सांगितले आहे]


# वनवासी कल्याण आश्रम, चिंचवली केंद्रात ‘रानपाखरं’ च्या ७५ व्या अंकाचा प्रकाशन सोहळा संपन्न



वनवासी कल्याण आश्रम विद्यार्थी वसतिगृह, चिंचवली केंद्र, पनवेल येथे २४ जानेवारी २०२६ रोजी ‘रानपाखरं’ या मासिकाच्या ७५ व्या अंकाचा प्रकाशन सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. या अंकाचे प्रकाशन आश्रमातील मुलांच्या हस्ते करण्यात आले, ज्यामुळे मुलांमध्ये आनंदाचे वातावरण होते. या प्रसंगी व्यासपीठावर उपस्थित असलेल्या मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. ‘रानपाखरं’च्या संपादिका मृदुला परचुरे यांनी ‘रानपाखरं’च्या प्रवासावर प्रकाश टाकला. सह-संपादिका सुवर्णा भट यांनी साहित्याचे महत्त्व विशद केले. कोकण प्रांत संघटन मंत्री प्रदीपजी पाटील यांनी संघटनेची भूमिका व कार्यावर मार्गदर्शन केले. ज्योतीताई जपे व प्रियाताई आचवल यांनी शिक्षण आयामाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांशी संवाद साधला. याप्रसंगी वरिष्ठ कार्यकर्ते कोचरेकर काका, हेमांगी भागवत आणि माजी पालक भाटवडेकर यांचीदेखील प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे स्वरूप, कार्यक्रमाचे नेटके सूत्रसंचालन चिंचवली केंद्रप्रमुख विवेक फुफाणे यांनी केले. उपस्थितांनी आपल्या मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी आणि वाचन संस्कृती जोपासण्यासाठी प्रोत्साहन दिले. कार्यक्रमाचा समारोप प्रियाताई आचवल यांनी आभार मानून केला. ‘रानपाखरं’ हा अंक कै. सुनीताताई गोगटे यांनी २००४ साली वनवासी मुलांसाठी सुरू केला. हा अंक वनवासी कल्याण आश्रमच्या आश्रमशाळा, वसतिगृहे व संस्कार केंद्रांमध्ये वितरित केला जातो. वनवासी, ग्रामीण व शहरी भागात हा अंक त्याच्या वैविध्यपूर्ण माहिती, सदरं व आकर्षक मांडणीसाठी लोकप्रिय आहे.

# जिल्हा परिषदेच्या प्रांगणात शंभुराजेंच्या पुर्णाकृती पुतळ्यांसह महापुरूषांच्या रखडलेल्या स्मारकासाठी शंभुप्रेमी आक्रमक :- डॉ.गणेश ढवळे

बीड:- ( दि.०२)बीड जिल्हा परिषदेच्या नुतन प्रशासकीय इमारतीसमोर महापुरूषांचे पुतळे उभारल्याशिवाय स्थलांतर नाही, लोकार्पण सोहळा होऊ देणार नाही या शंभुप्रेमींच्या आक्रोशानंतर तत्कालीन सत्ताधाऱ्यांनी दि.१९ मार्च २०२२ रोजी छत्रपती संभाजी महाराजांच्या पुतळ्याचे भुमिपुजन करूनच लवकरच काम सुरू करण्यात येईल असे आश्वासन दिले.या घटनेला आता पुढील महिन्यात ४ वर्षे होत आहेत.अद्याप कामाचा पत्ता नसुन केवळ कागदी घोडे नाचवण्याचा प्रकार सुरू आहे. जिल्हा परिषद प्रशासकीय इमारतीच्या आवारात छत्रपती संभाजी महाराज यांचा पुर्णाकृती पुतळा , छत्रपती राजर्षी शाहू महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर या महापुरूषांचे अर्धाकृती पुतळे उभारण्याचे प्रस्तावित असुन यामध्ये लोकनेते स्व.अजितदादा पवार यांच्या स्मारकाचा समावेश करण्यात यावा या मागणीसाठी आज दि.०२ सोमवार रोजी शंभुप्रेमी
डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा परिषद कार्यालयाच्या प्रांगणात जोरदार घोषणाबाजी करत निदर्शने करण्यात आली. प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड विलास जाधव, कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग मोमीन सय्यद शकील अहेमद यांच्या मार्फत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, ग्रामविकास मंत्री यांना निवेदन देण्यात आले. यावेळी आंदोलनात राहुल वायकर,संजय गोडसे, जयदत्त थोटे,शेख युनुस, शेख मुबीन,सुदाम तांदळे, राजेंद्र आमटे, नितिन सोनावणे, राहुल कवठेकर




,विजय लाटे वरदआदी सहभागी होते.
दिवंगत लोकनेते स्व .अजितदादा पवार यांचाही पुतळा उभारण्याची मागणी
---
जिल्हा परिषदेच्या आवारात महापुरूषांसह दिवंगत लोकनेते शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे,सुंदरराव सोळंके व लोकनेते गोपीनाथराव मुंडे , दिवंगत लोकनेत्या केशरकाकु क्षीरसागर यांचे पुतळे उभारण्याचे प्रस्तावित असुन नुकतेच विमान अपघातात मृत्युमुखी पडलेले बीड जिल्ह्याचे विकास पुरूष लोकनेते स्व.अजितदादा पवार यांचाही पुतळा उभारण्यात यावा अशी मागणी आंदोलनकर्ते यांनी केली आहे.

सन २०२३ मध्ये ६० लक्ष तर चालु आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये ५० लक्ष रूपयांची तरतूद करूनही काम रखडलेल्या अवस्थेत ; निधी अखर्चित :- डॉ.गणेश ढवळे
---
१६ जानेवारी २०२३ मध्ये जिल्हा परिषद कार्यालय आवारात केलेल्या लक्ष्यवेधी आंदोलनानंतर माहे फेब्रुवारी २०२३ च्या अर्थसंकल्पात ६० लक्ष रूपयांची तरतूद करण्यात आली होती. तर १४ मे २०२५ रोजी जिल्हा परिषद कार्यालयात केलेल्या धरणे आंदोलनानंतर चालु आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये जिल्हा परिषद उत्पन्नातुन ५० लक्ष रूपयांची तरतूद करण्यात आल्याचे लेखी पत्र मोमीन सय्यद शकील अहमद कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग क्रमांक १ जिल्हा परिषद बीड यांनी आंदोलनकर्त्यांना दिले होते मात्र काम रखडले असल्याने निधी अखर्चित राहिल्याचे दिसून येते ही अत्यंत गंभीर आणि वेदनादायी बाब असल्याचे डॉ.गणेश ढवळे यांनी म्हटले आहे.

मागणी आणि घोषणा करणारे सत्तेत
---
महापुरुषांसह लोक नेत्यांच्या पुतळ्यांची मागणी करणारे आणि याबाबत घोषणा करणारे नेते आज एकत्र राज्याच्या सत्तेत आहेत.ता.१९ मार्च २०२२ रोजी तत्कालीन पालकमंत्री धनंजय मुंडे, मंत्री अब्दुल सत्तार, तत्कालीन उपाध्यक्ष आणि विद्यमान खासदार बजरंग सोनावणे हे प्रत्यक्ष तर तत्कालीन ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ यांच्या ऑनलाईन उपस्थितीत जिल्हा परिषदेच्या नव्या इमारतीचे लोकार्पण आणि महापुरुषांच्या पुतळ्यांचे भुमिपुजनही पार पडले होते. तेव्हा सत्तेत असलेली मंडळी आत्ताही सत्तेत आहेत मात्र महापुरूषांच्या पुतळ्यांबाबत सरकारला अनास्था का? असा सवाल डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी उपस्थित केला आहे.

सं पा द की य

## संजय गांधी, माधवराव शिंदे, विजय रूपाणी ते अजित पवार...

प्रशांत बाफना 8055440385 महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा विमान अपघातात मृत्यु झाल्याच्या घटनेने सारा देश हादरला. बारामती येथे विमान धावपट्टीवर उतरत असतानाच कोसळले, काही क्षणातच मोठा स्फोट झाला, आगीचा मोठा लोळ उसळला आणि अजित पवार यांच्यासह वैमानिक , सहवैमानिक, अंगरक्षक, अटेंडंट यांचाही मृत्यू झाला विमान अपघातात राजकीय नेत्याचा बळी घेणारी ही काही पहिलीच घटना नव्हे. संजय गांधी ( १९८० ), माधवराव शिंदे ( २००१ ), वाय. एस. राजशेखर रेड्डी ( २००९ ), विजय रूपाणी ( २०२५ ) आदी नेत्यांचा विमान अपघातात मृत्यु झाला. त्यांच्या मृत्युनंतरही देश हळहळला होता. विमान अपघातात मृत्युंची मालिका आणखी किती काळ चालू राहणार आहे ? भारतीय राजकारणात विमान प्रवास ही काही चैनिची बाब राहिलेली नाही. कार्यक्रम, दौरे, सभा, निवडणूक प्रचार यासाठी देशभर सर्वच पक्षाचे प्रमुख व उच्च पदस्थ विशेषत: सत्ताधारी पक्षाचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, मंत्री विमानाने सतत प्रवास करीत असतात. जोपर्यंत काही अनुचित घडत नाही तोपर्यंत नेत्यांचे विमान प्रवास नित्य नेमाने चालू असतात. अचानक दुर्घटना घडली की गमावलेला नेता किंवा त्याच्याबरोबर प्रवास करणारे सहकारी परत येत नाहीत. अजितदादांच्या पार्थिवावार बारामतीत विद्या प्रतिष्ठानच्या प्रांगणात लक्षावधींच्या साक्षीने अंत्यसंस्कार चालू असताना, परत या परत या, अजितदादा परत या, असा आक्रोश चोहोबाजूने प्रकट होत होता. लोकांच्या त्यांच्याविषयी भावना प्रेमाच्या व आदराच्या असल्या तरी ते खरंच परत येऊ शकणार आहेत काय ? आपली विमान प्रवास व्यवस्था सदोष आहे की मानवी चुकांमुळे विमान अपघात होत आहेत ? प्रत्येक वेळी ब्लॅक बॉक्सची तपासणी झाली की विमान अपघाताचे नेमके कारण समजेल असे सांगण्यात येते. आजवर लहान मोठे असंख्य विमान अपघात झाले. त्यात अनेक महत्वाच्या व्यक्तिंचे बळी गेले. विमान अपघात झाल्यावर सर्वसारखेच असतात. प्रसिध्दी केवळ नेते, राजकारणी, सेलेब्रेटींना मिळते. इतर प्रवासी किंवा क्रु मेंबर्स तर दुर्लक्षित राहतात. अजितदादांच्या मृत्युनंतर हाच अनुभव आला. फ्लाईट अटेंडंट २९ वर्षांची पिंकी माळी ही मुंबईची. तिचाही विमान अपघातात मृत्यु झाला. तिच्यावर शिवाजी पार्क येथे अंत्यस्कार झाला. अजितदादांच्या अंत्यसंस्काराचे सर्वच वृत्तवाहिन्यांनी थेट प्रक्षेपण केले. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केद्रीयमंत्री नितीन गडकरी, भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन, गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत अशी व्हीव्हीआयपी नेत्यांची तेथे गर्दी होती. मात्र पिंकीच्या मृत्युनंतर विमान कंपनीने किंवा सरकारकडून तिच्या कुटुंबियांशी कोणीही संपर्कही साधला नाही म्हणून तिच्या वडिलांनी संताप व्यक्त केला. महाराष्ट्रात आणि अन्य राज्यात अनेक नेते आपल्या मतदारसंघात जाण्यासाठी, राजधानीत पोचण्यासाठी विमान प्रवास करीत असतात. प्रवासी विमानतून जाण्याऐवजी नेत्यांना आता खाजगी छोटी विमाने अधिक पसंत असतात. आपल्या सोयीनुसार निघता येते. खाजगी विमानात मोजकेच सहकारी असतात व प्रायव्हसी मिळते. शिवाय प्रवासाच्या वेळेत बचत होते. एकाच दिवसात चार पाच ठिकाणी जाता येते. निवडणुकीच्या काळात तर खाजगी छोट्या विमानांना, हेलिकॉप्टर्स, चार्टर्ड फ्लाइटसना राजकीय नेत्यांकडून मोठी मागणी असते. विमानाची देखभाल, नियमित तांत्रिक तपासणी, सुरक्षितता,, हवामान, वैमानिकांचा अनुभव, खाजगी कंपनीचे अगोदरचे रेकॉर्ड, नागरी विमान सेवा संचालनालयाकडून ना हरकत प्रमाणपत्र, कंपनीची सेवा, असे अनेक मुद्दे महत्वाचे असतात. विमान अपघात कुठे ना कुठे होत असतात. पण त्यातून आपण काही बोध घेऊन सुधारणा करणार की नाही ? मानवी चुकांमुळे किंवा तांत्रिक बिघाड झाल्यामुळे विमान अपघात होतात हे प्रमुख कारणनंतर ऐकायला मिळते. अनुभवी व उत्तम प्रशिक्षित वैमानिक असणे हे महत्वाचे आहे. सतत उड्डाणामुळे वैमानिकाला पुरेशी विश्रांती मिळाली आहे काय हेसुध्दा तेवढेच महत्वाचे आहे. बारामतीत कोसळलेले विमान हे व्हीआरएस एव्हीएशन या खाजगी कंपनीचे होते. गेली सोळा वर्ष ते सेवेत आहे. या लिएरजेट विमानाला २०२३ मधे मुंबई विमानतळावर अपघात झाला होता. १४ सप्टेंबर २०२३ रोजी मुसळधार पाऊस व कमी व्हिजिबलटी असताना धावपट्टीवर उतरताना विमान घसरले होते. पण त्यावेळी विमानातील आठही प्रवाशांचे जीव वाचले होते. लोकसभा माजी अध्यक्ष जीएमसी बालयोगी यांचा ३ मार्च २००२ रोजी आंध्र प्रदेशात हेलिकॉपटर कोसळून मृत्यु झाला. अटल बिहारी वाजपेयी यांचे एनडीए सरकार असताना ते लोकसभा अध्यक्ष होते. तेलगु देशमचे बॉस एन. चंद्राबाबू नायडू यांचे ते विश्वासु सहकारी म्हणून ओळखले जात असत. ३१ मार्च २००५ रोजी उद्योगपती व राजकारणी ओ. पी जिंदाल यांचा विमान अपघातात मृत्यु झाला. त्याच विमानात हरयाणाचे माजी मुख्यमंत्री बन्सीलाल यांचे पुत्र सुरेंद्र सिंग होते, त्यांचाही मृत्यु झाला. जिंदाल हे काँग्रेस सरकारमधे उर्जामंत्री होते तर सुरेंद्र सिंग हे कृषीमंत्री होते. चंदिगडहून दिल्लीली परताना उत्तर प्रदेशातील सहारनपूर येथे अपघात झाला. अरूणाचल प्रदेशचे तत्कालीन मुख्यमंत्री दोरजी खंडू यांचा ३० एप्रिल २०११ रोजी हेलिकॉप्टर अपघातात मृत्यु झाला. इटानगरहून तवांगला जाणारे हेलिकॉप्टर बेपत्ता झाले. मोठ्या शोध मोहीमेनंतर पाच दिवसांनी त्याचे अवशेष पाच हजार मीटर उंचीवर बर्फांच्छादीत पर्वतावर सापडले. आंध्र प्रदेशचे तत्कालीन मुख्यमंत्री राजशेखर रेड्डी यांचा २ सप्टेंबर २००९ रोजी हेलिकॉप्टर कोसळून मृत्यु झाला. चित्तूर जिल्ह्यातील एका कार्यक्रमासाठी ते निघाले होते. लष्कराच्या मदतीने हेलिकॉप्टरचे अवशेष दाट जंगलात सापडले. काँग्रेसचे नेते माधवराव शिंदे यांचा ३० सप्टेंबर २००१ रोजी उत्तर प्रदेशातील मैनपुरी जिल्ह्यात विमान अपघातात मृत्यु झाला. ते कानपूरला सभेसाठी जात होते. माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांचे पुत्र संजय गांधी यांचा २३ जून १९८० रोजी दिल्लीतील सफदरजंग विमानतळावर मृत्यु झाला. ते स्वतःच खाजगी विमान चालवत होते. त्यांच्या सोबत सुभाष सक्सेना सहवैमानिक होत, विमान कोसळून झालेल्या अपघातात त्यांचाही मृत्यु झाला. १२ जून २०२५ रोजी अहमदाबाद विमानतळावर विमान कोसळून झालेल्या अपघातात २४२ पैकी २४१ जणांचा मृत्यु झाला. याच विमानात गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रूपाणी होते, त्यांचाही मृत्यु झाला. ऑगस्ट २०१६ मधे आनंदीबेन पटेल यांनी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिल्यानंतर विजय रूपाणी हे मुख्यमंत्री झाले. सन २०२१ च्या मध्यापर्यंत ते या पदावर होते. अहमदाबादच्या दुर्घटनेत भारतीय वंशाचा एक ब्रिटीश प्रवासी मात्र बचावला. गेल्या वर्षीच्या दीपावली विशेषांकात सिध्देश्वर मारटकर यांचा ज्योतिष ज्ञान मथळ्याखाली लेख प्रसिध्द झाला आहे. त्यात त्यांनी डिसेंबर २०२५ व जानेवारी २०२६ मधे राजकीय व सामाजिक घडामोडींविषयी भविष्य वर्तवताना प्रमुख व्यक्तिंसाठी प्रतिकुल काळ, घात अपघात, मृत्युची शक्यता वर्तवली आहे. या काळात निवडणुका झाल्यास सत्ताधारी पक्ष किंवा महायुतीला चांगले यश मिळेल. दशमात राहु असल्याने निवडणुकीत गैरप्रकार झाल्याचे सत्ताधारी पक्षावर आरोप होतील, असे म्हटले आहे. बुध- मंगळ योगामुळे या काळात होणाऱ्या वादग्रस्त विधानांमुळे मोठे नेते – व्यक्ति अडचणीत येतील. वादग्रस्त वक्तव्यांमुळे धार्मिक व जातीय तणाव निर्माण होण्याची शक्यता आहे. पक्षप्रमुख, धर्मप्रमुख, प्रमुख पदावरील व्यक्ति यांच्यासाठी हा काळ प्रतिकुल राहील. या क्षेत्रातील मोठ्या व्यक्तिंचे अपघात, घातपात किंवा मृत्युच्या घटना संभवतात... असेही त्यांनी आपल्या लेखात भविष्य वर्तवले होते. हे भविष्य वाचल्यावर नियतीने बोलावल्यावर जावेच लागते, हे अजितदादांचे वाक्य आठवते

# पोलीस निरीक्षकांचा दनका वाळू माफियाचा मोडला मनका

## तिनं टिप्पर सहित 19 लाख 70 हजारांचा मुद्देमाल जप्त 6 जणांवर गुन्हा दाखल

जिंतूर (प्रतिनिधी) तालुक्यातील अवैध वाळू तस्करी करणाऱ्यावर पोलीस निरीक्षक गजेंद्र सरोदे यांनी धडाकेबाज कारवाई करत तिनं टिप्पर सहित 19 लाख 70 हजारांचा मुद्देमाल जप्त करीत 6 जणांच्या मुसक्या आवळल्या व गंभीर स्वरूपाचे गुन्हा दाखल केला या कारवाईने अवैध वाळू ची तस्करी करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत

या प्रकरणी पोलीस शिपाई नामदेव सदाशिवराव धोत्रे यांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे या प्रकरणी आरोपी शुभम गोपाळ ढोबळे,वय 21 वर्ष चालक रा सेनगाव जि हिंगोली, गणेश




विटकरी रा सेनगाव जि हिंगोली, दिपक झनकराव कुटे वय 24 वर्ष रा चालक शिवनी , मालक सह आरोपी भगवान ढाकणे रा सेनगाव जि हिंगोली, विष्णू छत्रगुण कोटकर वय 24वर्ष चालक रा भानखेडा, मालक सह आरोपी बाळासाहेब मस्के रा जिंतूर यांच्या विरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे या कारवाईत टिप्पर एम एच 38 एक्स 9100 पिवळ्या रंगाचा हेड 3 ब्रास वाळू अंदाजे किंमत 7 लाख 30 हजार, एम एच 38 एक्स 3788 पिवळ्या रंगाचा हेड व 2 ब्रास वाळू अंदाजे किंमत 6 लाख 20 रुपये ,एम एच 22 ऐ ऐन 5145 पिवळ्या रंगाचा हेड 2 ब्रास वाळू अंदाजे किंमत 6 लाख 20 हजार रुपये असा एकूण मुद्देमाल 19 लाख 70 हजार रुपये जप्त करण्यात आला आहे गणेश नगर ते सावळीत जाणाऱ्या रस्त्यावर 28 जानेवारी रोजी सकाळी सकाळी वरिल आरोपी टिप्पर द्वारे अवैध वाळू ची चोरी करून वाहतूक करताना आढळुन आले आहे या प्रकरणी पुढील तपास पोलीस निरीक्षक गजेंद्र सरोदे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे या धडाकेबाज कारवाईने जिंतूर तालुक्यातील अवैध वाळू उपसा करून तस्करी करणाऱ्या धन्नासेठांचे धाबे दणाणले आहेत या कारणांमुळे वाळू ची तस्करीला मोठा आळा बसेल अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करीत आहेत

# संत 'आमचे म्हणू नका! संत सर्वांचे माय - बाप!– ह.भ.प. अदिनाथ महाराज लाड (आळंदी देवाची)

जिंतूर (प्रतिनिधी): "संत हे कोण्या एका समूहाचे नसतात. संत सर्व जीव - शिव समाजाचे, सर्व मानवतेचे असतात. विठोबाचे नामस्मरण माणसाला अहंकारातून बाहेर काढून प्रेम, समता आणि सामाजिक एकात्मतेकडे घेऊन जाते," असे प्रतिपादन ह.भ.प. अदिनाथ महाराज लाड यांनी पांगरी येथे आयोजित अखंड हरिनाम सप्ताहात केले. स्वा. सु. निवासी जोग महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त श्री पंढरीनाथ देवस्थान संस्थान, पांगरी तसेच समस्त गावकरी मंडळींच्या संयुक्त पुढाकारातून दि. ०१ ते ०८ फेब्रुवारी २०२६ दरम्यान अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार (दि. ०१ फेब्रुवारी) रोजी कीर्तनसेवेत बोलताना अदिनाथ महाराज लाड म्हणाले की, "विठोबाचे नाम हे भवसागरातून तारून नेणारे अमृत आहे. नामस्मरणामुळे संचित, प्रारब्ध आणि क्रियमाण कर्मांचे बंधन शिथिल होते व जन्म–मरणाच्या फेऱ्यातून मुक्तीचा मार्ग सापडतो." विठोबाच्या नामस्मरणाने त्रिविध तापांचा नाश होतो, मन शुद्ध होते आणि समाजात सद्भावना वाढीस लागते, असा संदेश देत त्यांनी आजच्या धावपळीच्या, तणावपूर्ण जीवनात नामस्मरण हेच खरे संजीवनी औषध असल्याचे स्पष्ट केले. संत परंपरेचा उल्लेख करताना त्यांनी संत तुकाराम महाराजांच्या अभंगांचा दाखला देत, मायेवर मात करून आत्मिक समाधान मिळविण्याचा मार्ग दाखविला. यावेळी त्यांनी संतवचन "चातुर्य लपवी। महत्व हारवी। पिसेपण मिरवी। आवडोनि॥" याचा सखोल अर्थ उलगडून सांगितला. खरा ज्ञानी पुरुष आपले चातुर्य मिरवत नाही, अहंकार टाळतो आणि स्वतःला सामान्य मानतो, हाच संतविचार असल्याचे त्यांनी नमूद केले. या अभंगाचा जिवंत प्रत्यय युवकमित्र ह.भ.प. नारायण

### – पांगरी येथे अखंड हरिनाम सप्ताह उत्साहात सुरू



महाराज यांच्या जीवनातून मिळतो, असे सांगत त्यांच्या साधेपणा, नम्रता आणि समाजाशी असलेल्या निखळ आपुलकीचे विशेष कौतुक करण्यात आले. अपार ज्ञान असूनही त्याचे प्रदर्शन न करता समाजाला मोठे मानणारी वृत्ती हीच संतवचनांची खरी फलश्रुती असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. अखंड हरिनाम सप्ताहासाठी पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सामाजिक ऐक्य, व्यसनमुक्ती, सदाचार, मानवी मूल्यांची जोपासना आणि नैतिकतेचा संदेश या सप्ताहातून दिला जात असून अशा धार्मिक-सांस्कृतिक उपक्रमांमुळे समाजात शांती, सहकार्य आणि सद्भावना वृद्धिंगत होत असल्याची भावना उपस्थित भाविकांनी व्यक्त केली.

# ४ फेब्रुवारीपासून जंतर-मंतर येथे बेमुदत धरणे आंदोलन

अहिल्यानगर/ प्रशांत बाफना - शेतीमालाला योग्य दर, शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी ठोस उपाययोजना आणि स्थिर राष्ट्रीय शेती धोरण जाहीर करण्याच्या मागणीसाठी देशातील शेतकरी पुन्हा एकदा रस्त्यावर उतरले असून, ४ फेब्रुवारी २०२६ पासून नवी दिल्लीतील जंतर-मंतर मैदानावर बेमुदत धरणे आंदोलन छेडण्यात येणार आहे. केंद्र सरकारच्या चुकीच्या शेती धोरणांमुळे शेतकरी आर्थिकदृष्ट्या उद्ध्वस्त होत असून, "अन्नदाता जगतोय की मरतोय, याची सरकारला फिकीर उरलेली नाही," असा संतप्त आरोप शेतकरी बाळासाहेब सदाशिव शिंदे रा.नवीन दहिफळ ता.शेवगांव (शेतकरी) यांनी केला आहे. उत्पादन खर्च प्रचंड वाढलेला असताना शेतीमालाला मिळणारा भाव मात्र कवडीमोल असल्याने शेतकऱ्यांवर आत्महत्येची वेळ येत असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. आयात धोरणातील ढिसाळपणा, भाव पडू दिल्यानंतर मदतीची घोषणा आणि प्रत्यक्षात न मिळणारी मदत यामुळे शेतकरी पूर्णतः हतबल झाल्याचे चित्र आहे. सरकारच्या धोरणांमुळे शेतकरी कर्जबाजारी नैसर्गिक आपत्ती, अवकाळी पाऊस, दुष्काळ यामुळे होणारे नुकसान भरून काढण्यात सरकार अपयशी ठरले असून, याचा थेट फटका शेतकऱ्यांना बसत आहे. योग्य हमीभाव, कर्जमाफी आणि तत्काळ आर्थिक मदत न दिल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही देण्यात आला आहे. शेतकऱ्यांच्या प्रमुख मागण्या

- उत्पादन खर्चावर ५० टक्के नफा धरून हमीभाव जाहीर करावा
- भाव कोसळल्यास तात्काळ आर्थिक मदत द्यावी
- शेतीमाल आयात धोरण शेतकरीविरोधी न ठेवता पारदर्शक करावे
- स्थिर राष्ट्रीय शेती धोरण तात्काळ जाहीर करावे
- आपत्तीग्रस्त व कर्जबाजारी शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी करावी

"मागण्या मान्य झाल्याशिवाय आंदोलन मागे घेतले जाणार नाही. हा लढा शेती व शेतकऱ्यांच्या अस्तित्वाचा आहे," असा ठाम इशारा आंदोलनकर्त्यांनी दिला आहे. प्रशासनाला आंदोलनाची पूर्वसूचना देण्यात आली असून, हे आंदोलन पूर्णतः शांततेच्या मार्गाने होणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे. मात्र, सरकारने दखल न घेतल्यास आंदोलनाची तीव्रता वाढवण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे

# रस्ता अपघातातील तरुणाचा प्राण वाचविण्यासाठी धडपड केल्याबद्दल सामाजिक कार्यकर्ते बाजीराव ढाकणे सन्मानित

### अपघातग्रस्त तरुणास जीवदान देणाऱ्या ढाकणे दाम्पत्याचा लोकशाही पत्रकार संघाकडून सन्मान

बीड (प्रतिनिधी) : - मौजे जोला (ता. केज) येथील सामाजिक कार्यकर्त्या सौ. आशाताई बाजीराव ढाकणे व सामाजिक कार्यकर्ते बाजीराव नवनाथ ढाकणे यांनी गुरूवार दिनांक २२ जानेवारी २०२६ रोजी केज - बीड रोडवरील आंबाळाच्या बरडाच्या पुर्वेस असलेल्या पुलाजवळ रस्त्यालगतच्या खड्ड्यांमध्ये बेशुद्ध अवस्थेत पडलेल्या अपघातग्रस्त तरुणास वेळेत मदत करून माणुसकीचा आदर्श निर्माण केला. अपघातग्रस्त धिरज भानुदास भवर (मु. आष्टा हरीनारायण, ता. आष्टी) या तरुणास त्यांनी तातडीने १०८ रुग्णवाहिकेतून बीड येथील जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. त्यांच्या या सामाजिक कार्याची दखल घेत लोकशाही पत्रकार संघाच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला.अपघातानंतर जखमी तरुण गंभीर अवस्थेत असल्याचे लक्षात येताच ढाकणे दाम्पत्याने क्षणाचाही विलंब न करता १०८ रुग्णवाहिकेला संपर्क साधला. वेळेत रुग्णालयात दाखल केल्यामुळे जखमीवर तातडीचे उपचार सुरू होऊ शकले आणि त्याचा जीव वाचण्यास मदत झाली. संकटाच्या वेळी धावून जाऊन केलेली ही मदत समाजासाठी प्रेरणादायी असल्याचे उपस्थित मान्यवरांनी नमूद केले.या सन्मान सोहळ्याला बीड जिल्हा वाहतूक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक विजय




जाधवर, वाचनालय संघाचे डॉ. राजेंद्र सानप, बीड नगरपालिकेचे नगरसेवक ॲड. गोविंद शिराळे, लोकशाही पत्रकार संघाच्या राष्ट्रीय अध्यक्षा सौ. सुनंदा केदार, बीड शहर वाहतूक शाखेचे मुंडे साहेब, शिंदे साहेब, गाडे साहेब, शेख मॅडम, लोकशाही पत्रकार संघाचे अध्यक्ष भागवत वैद्य, मराठवाडा कार्याध्यक्ष आत्माराम वाव्हळ, पाटील साहेब, बीड जिल्हा संघटक तथा पत्रकार संजय देवा कुलकर्णी (कुक्कडगावकर), प्रकाश गाडे, पत्रकार किशोर देवा कुलकर्णी यांच्यासह लोकशाही पत्रकार संघाची संपूर्ण टीम उपस्थित होती.यावेळी वाहतूक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर यांनी ढाकणे दाम्पत्याच्या कार्याचे विशेष कौतुक करत, "अपघातस्थळी मदतीला धावून जाणे हीच खरी समाजसेवा आहे. अशा माणुसकीच्या कृतीमुळे समाजात सकारात्मक संदेश पोहोचतो," असे मत व्यक्त केले. तसेच नागरिकांनी अपघात पाहिल्यास भीती न बाळगता जखमींना तातडीने मदत करावी, असे आवाहनही करण्यात आले. सत्कार स्वीकारताना ढाकणे दाम्पत्याने, "अपघातातील जखमीला वेळेत मदत मिळणे अत्यंत गरजेचे असते. प्रत्येक नागरिकाने माणुसकीच्या नात्याने पुढे येणे आवश्यक आहे," अशी भावना व्यक्त केली.

# मराठी व इतिहास विभागाच्या विद्यार्थ्यांनी घेतले उद्योगाचे धडे

दै. लोक आरंभ / प्रदीप पोटफोडे

विहामांडवा – ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकापुरते शिक्षण न देता प्रत्यक्ष उद्योगक्षेत्राचा अनुभव मिळावा, या उद्देशाने येथील आर.वाय.पी. कला महाविद्यालयाच्या मराठी व इतिहास विभागाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी गुळनिर्मिती उद्योगाची प्रत्यक्ष पाहणी करून उद्योगाचे धडे घेतले. महाविद्यालयातील मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. संजय शिंदे व इतिहास विभागप्रमुख प्रा. दत्ता साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली दि. २ फेब्रुवारी २०२६ रोजी विद्यार्थ्यांनी नवगाव (ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर) येथील प्रसिद्ध गुळमेश्वर कारखान्याला शैक्षणिक भेट दिली. या भेटीत विद्यार्थ्यांनी ऊसापासून गुळ पावडर तयार करण्याची संपूर्ण प्रक्रिया, त्यामागील तंत्रज्ञान, यंत्रसामग्री आणि उद्योग व्यवस्थापन यांचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. आर.वाय.पी. कला महाविद्यालयात "चला उद्योगाला साथ देऊ



आणि राष्ट्रोन्नतीचे साक्षीदार होऊ" हा उपक्रम मागील चार वर्षांपासून सातत्याने राबविला जात असून, विविध औद्योगिक स्थळांना भेट देऊन विद्यार्थ्यांना कौशल्याधारित शिक्षण दिले जाते. गुळमेश्वर कारखाना गुळ पावडर निर्मितीसाठी राज्यातच नव्हे तर देश-विदेशात प्रसिद्ध असून येथील उत्पादनाची निर्यातही केली जाते. या वेळी साहाय्यक तंत्रज्ञ तांदळे साहेब यांनी ऊसाच्या रसावर विविध प्रक्रिया करून गुळ पावडर कशी तयार केली जाते, निर्मिती प्रक्रियेतून उरणाऱ्या गाळाचा विटा तयार करण्यासाठी कसा वापर केला जातो, मळीचा पुनर्वापर, तसेच वीज निर्मितीसाठी वापरली जाणारी उपकरणे याबाबत सविस्तर माहिती दिली. बचत गटाच्या माध्यमातून या कारखान्याची उभारणी करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांना विविध यंत्रसामग्रीचे कार्य प्रत्यक्ष दाखवून समजावून सांगण्यात आले. या नाविन्यपूर्ण शैक्षणिक उपक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुधाकर गीरे यांचे विशेष प्रोत्साहन लाभत असून त्यामुळे विद्यार्थ्यांना नव्या कौशल्यांचे शिक्षण घेण्याची संधी मिळत आहे. या शैक्षणिक भेटीत कु. पूजा डिक्कर, श्वेता गंगथीरे, मानसी जयस्वाल, प्राची बनसोडे, भाग्यश्री शिंदे, जिजाबाई शिंदे, वैष्णवी काळे, अश्विनी नाचण, अंजली तांबे, महेश नरके, भाऊसाहेब दुबाले आदी विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. प्रा. डॉ. संजय शिंदे व प्रा. दत्ता साबळे यांनी विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने अशा उपक्रमांत सहभागी होऊन उद्योग व कौशल्यपूर्ण शिक्षणाला प्राधान्य द्यावे, असे आवाहन केले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी उद्योगभेटी हे प्रेरणादायी पाऊल ठरत असून, शिक्षणासोबत रोजगारक्षमतेचे धडे देणारा हा उपक्रम कौतुकास्पद असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

# आमखेडा कॉर्नर सभा - भारतीय जनता पक्षाची जोरदार उपस्थिती..

सोयगाव / प्रतिनिधी..सुनील चोरमाले..
..सोयगाव शहरात

आमखेडा कॉर्नर येथे भारतीय जनता पक्षाच्या जिल्हा परिषद गटाच्या उमेदवार सौ. पुष्पाताई प्रकाश काळे यांच्या प्रचारासाठी मोठ्या प्रमाणात सभा आयोजित करण्यात आली. छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील आमखेडा गटात होणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत तिन्ही प्रमुख पक्षांनी उमेदवारी दिली आहे, त्यात भाजपाच्या उमेदवार सौ. पुष्पाताई प्रकाश काळे यांची प्रमुख चर्चा आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषद गटाच्या उमेदवारांसोबतच आमखेडा पंचायत समितीच्या उमेदवार सो. जयश्री गजानन पवार व निंबायती पंचायत समिती गणाचे उमेदवार श्री. बद्री हजारी राठोड यांनीही प्रचारात जोरदार आघाडी घेतली आहे.

आमखेडा परिसरातील प्रत्येक गावातील मतदारांनी त्यांचा उत्साह वर्धक प्रतिसाद दिला आहे. भाजपाच्या कार्यकर्त्यांनी या सभेत जोरदार उपस्थिती दाखवली. यावेळी भाजपाचे प्रमुख नेते आणि कार्यकर्ते सुरेश बनकर, रवींद्र काळे, राजेंद्र जावळे, सुनील भाऊ गवांडे,



गजानन चौधरी, कैलास काळे, वसंत बनकर, संजय आगे, नंदाबाई आगे, संजय चौधरी, मुन्ना ढगे, समाधान आगे, शंकर कोथलकर, दगडू अस्वार, मला बाई संजय चौधरी, दत्तू पोटदुखे, दिलीप दामधर, राजू चौधरी, सुखदेव ढगे, अर्जुन ढगे, उज्वल शेरे, सोनाजी मिसाळ, मोती वाघ, अशोक कोथलकर यांच्या नेतृत्वाखाली सभा यशस्वीरीत्या पार पडली.सभा हवीहवीशी आणि जनतेच्या सहभागाने भरली होती, ज्यामुळे आगामी निवडणुकीत भारतीय जनता पक्षाला जोरदार उमेदवारी मिळवण्याची आशा व्यक्त केली जात आहे.

# ग्रामसेवकावर धारदार शस्त्राने प्राण घातक हल्ला तिघांना अटक

### शिवरायांचा पुतळा बसवण्याच्या चर्चेवरून वाद



मुजीब खान . कन्नड _____
साहनगाव येथे सप्ताहासाठी आलेल्या ग्रामसेवकावर धारदार शस्त्राने प्राण घातला करण्यात आला याप्रकरणी देवगाव रंगारी पोलिसांनी तत्काळ कारवाई करत तिघांना अटक केली आहे योगेश्वर मधुकर घाटबळे वय (३६) साहनगाव हल्ली मुक्काम कन्नड हे सध्या बहिरगाव व कानडगाव येथे ग्रामसेवक म्हणून कार्यरत आहेत पत्नीसह साहनगाव येथे अखंड हरिनाम सप्ताह साठी आले होते दुपारी दिड च्या सुमारास मारुती मंदिरासमोर छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा बसून याबाबत गावकरी चर्चा करत असताना आरोपी संतोष सोपान घाटबळे याने वात घालून शिवीगाळ सुरू केलीऔ वादाचे रूपांतर हाणामारी झाले आस्था संतोष आणि पंकज सोपान घाटबळे यांनी योगेश घाटबळे यांना मारहाण केली यावेळी अंकुश सोपान घाटबळे यांनी दादर शस्त्राने हल्ला केला ज्यामध्ये घाटबळे यांच्या डाव्या गालावर गंभीर जखम होऊन मोठा रक्तस्त्राव झाला आरोपींनी यावेळी त्यांना व कुटुंबाला जिवंत न सोडण्याची धमकी दिली जखमी गाडबळे यांना देऊळगाव रंगारी ग्रामीण रुग्णालयात दाखल केले असता अधिक रक्तस्त्रावमुळे त्यांना पुढील उपचारासाठी औरंगाबाद येथे हलवण्यात आले आहे पोलिसांनी या प्रकरणी संतोष गाडबळे पंकज घडवले आणि अंकुश घाडबळे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून त्यांना ताब्यात घेतले आहे सपोनि संदीप राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली जमादार वाल्मीक कांबळे पुढील तपास करत आहेत

दैनिक
लोकआरंभ
मंगळवार ३ फेब्रुवारी २०२६
www.lokaarambh.com



## बालमटाकळी जिल्हा परिषद शाळेचे क्रीडा स्पर्धेत घवघवीत यश



अहिल्यानगर (प्रशांत बाफना):*बालमटाकळी येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक आदर्श शाळेने गुणवत्तेत स्वतःला सिद्ध केले आहेच पण खेळातही उंच भरारी घेतली आहे.

जिल्ह्याच्या अगदी शेवटच्या टोकाला वसलेली ही एक आदर्श केंद्रशाळा. केंद्रशाळा म्हटली की ढीगभर कामे, आधीच मिळालेली आदर्शत्वाची जबाबदारी. एक काम संपत नाही तोपर्यंत दुसरे काम आलेले !

फक्त मातीला मैदान बनवून त्यात आखणी करणे, पाणी मारणे, स्वच्छता सांभाळणे ही सर्व कामे येथील श्री. दत्तात्रय मंजनर सर व सहकाऱ्यांनी केली. सरावास आवश्यक साधनसामग्री जुळवणे हे ही कठीण होते. मुलांना आवश्यक स्पोर्ट ड्रेस साठी सुविध कलेक्शनचे मालक श्री सुविध बोथरा यांना प्रेरित करून लोकसहभाग मिळवला तो श्री.रुस्तूम दौंड सर व श्री. जयराम देवढे सर यांनी! श्री.दत्तात्रय मंजनर सर यांनी रविवार सुट्टीचे दिवस व शालेय वेळेव्यतिरिक्त कबड्डी, खो-खो व वैयक्तिक स्पर्धेचा खूप चांगला सराव घेतला. यामध्ये कबड्डीचा मुलींचा छोटा गट, खो-खोचा मुलींचा छोटा गट, खो-खोचा मुलांचा छोटा गट हे तीनही संघ अजिंक्य ठरले आणि जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेसाठी पात्र झाले आहेत. तसेच ५० मीटर धावण्याच्या स्पर्धेत यशराज बाबासाहेब सोनवणे याने तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला. तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत बालमटाकळी शाळेने संपूर्ण शेवगाव तालुक्याचे मैदान गाजवले आहे. या यशामागे क्रीडाशिक्षक श्री.दत्तात्रय मंजनर सर, वर्ग शिक्षक श्री.जयराम देवढे सर, श्री.बाळासाहेब गोर्डे सर या शिक्षकांचे मोलाचे योगदान लाभले. स्वतः मैदानात येऊन प्रेरणा देणारे कायम कार्यरत असणारे सरपंच श्री.राम बामदळे तसेच कायम सहकार्य करणारे शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्री. बाबासाहेब सोनवणे , उपाध्यक्ष सत्तार शेख व सर्व सदस्य यांचे मोलाचे सहकार्य लाभले.शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती विजया कवडे, श्री.रुस्तूम दौंड, श्री.किरण बैरागी, श्री.दिगंबर गाडेकर, श्री.एस.के. पवार, श्रीमती अनिता हिवाळे, श्रीमती मनीषा मिसाळ यांनीही कौतुकास्पद कामकाज पाहिले.

या यशाबद्दल गटशिक्षणाधिकारी श्रीमती शैलजा राऊळ मॅडम,विस्तार अधिकारी डॉ.शंकर गाडेकर केंद्रप्रमुख श्री.जगदीश बोडखे,किसन राठोड ,श्री कल्याण पोटभरे तसेच पालक व सर्व ग्रामस्थ यांनी कौतुक केले

## मुलांच्या अंगातील गुण ओळखून शिक्षक व पालकांनी शैक्षणिक विकास साधावा - डॉ. योगेश क्षीरसागर

### आझाद हिंद सेमी इंग्लिश उर्दू स्कूलचा वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात





*बीड (प्रतिनिधि):- मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी केवळ अभ्यासक्रमापुरते शिक्षण न देता त्यांच्या अंगातील सुप्त गुण, कला व आवड ओळखून शिक्षक आणि आई-वडिलांनी योग्य मार्गदर्शन करणे आवश्यक आहे. असे झाल्यास मुलांचा शैक्षणिक व वैयक्तिक विकास अधिक प्रभावीपणे घडतो, असे प्रतिपादन डॉ. योगेश भय्या क्षीरसागर यांनी केले.

आझाद हिंद बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, कामखेडा (बीड) संचालित आझाद हिंद सेमी इंग्लिश उर्दू स्कूल, काझी नगर, बीड येथे आयोजित स्नेहसंमेलनाचे उद्घाटन डॉ. योगेश भय्या क्षीरसागर यांच्या हस्ते झाले यावेठी ते बोलते होते. ही शाळा मागील १८ वर्षांपासून शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय सेवा देत असून वर्ग पहिलीपासून संगणक शिक्षण, शिष्यवृत्ती परीक्षा तयारी, विविध खेळ, तसेच स्पर्धा परीक्षांची पूर्वतयारी करून घेतली जाते, ही बाब कौतुकास्पद असल्याचे त्यांनी नमूद केले. शाळेस कोणत्याही प्रकारचे सहकार्य लागल्यास आपण मदत करू, असेही त्यांनी आश्वासन दिले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षण विस्तार अधिकारी माटे साहेब, जिल्हा वक्फ अधिकारी शोएब शेख, नवगण शिक्षण संस्थेचे संचालक आमेर सिद्दीकी, केंद्रप्रमुख माया सोनवणे, तंटामुक्ती अध्यक्ष राजू पटेल, उपसरपंच शेख शफिक, शिक्षण समिती अध्यक्ष मतीन शेख, मुख्याध्यापक सुनील कुर्लेकर, शेख रशीद, मुस्ताक पटेल, शेरू पटेल, समाजसेवक काझी नजीब, मुसा खान, नूर लाला, संस्था सचिव शेख मुसा आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते बालविवाह रोखण्याबद्दल जिल्हा पुरस्कारप्राप्त मन्सूरी ए. एन., राज्य आदर्श शिक्षिका चंद्रकन्या सरसेकर, बॉक्सिंग गोल्ड मेडलिस्ट अबरार खान तसेच शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. या स्नेहसंमेलनाचे नियोजन शेख फैसल, सिद्दीकी बशीर, सय्यद आवेज, शेख मुद्दस्सीर, शेख अयाज, शेख रज्जाक तसेच महिला शिक्षकवृंदाने केले. बालआनंद मेळाव्याचा उपस्थित विद्यार्थी, पालक व नागरिकांनी उत्स्फूर्त आनंद घेतला.

# महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत कर्मचारी संघटना ४५/११ आष्टी शाखेची स्थापना

आष्टी | प्रतिनिधी
महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत कर्मचारी संघटना ४५/११ शाखा आष्टीची स्थापना जिल्हा सचिव अमोल तुपे यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात करण्यात आली. या प्रसंगी आष्टी तालुक्यातील सर्व ग्रामपंचायत कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या बैठकीत संघटनेच्या आष्टी तालुका कार्यकारिणीची निवड सर्वानुमते करण्यात आली. त्यामध्ये अध्यक्षपदी दत्तू देसाई, तालुका सचिवपदी संजय काकडे, तालुका उपाध्यक्षपदी वैभव खिळे व विकास शिरसागर यांची निवड करण्यात आली.
तसेच संघटनेच्या सदस्य म्हणून राहुल साबळे, महेश जठार, ऋषिकेश शेळके, राजेंद्र खिळे, नाना पवार, शंकर झुनगुरे, हारी शेलार, समीर सय्यद व अनिल पांडुळे यांची नियुक्ती



करण्यात आली. यावेळी जिल्हा सचिव अमोल तुपे यांनी ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्या, सेवा सुरक्षा, वेतनवाढ, पदोन्नती व कर्मचारी हक्कांबाबत मार्गदर्शन केले. संघटनेच्या माध्यमातून कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांसाठी एकसंघपणे लढा देण्याचे आवाहन त्यांनी केले.
नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांनी संघटनेची ध्येयधोरणे तळागाळातील कर्मचाऱ्यांपर्यंत पोहोचवून ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी सातत्याने कार्य करण्याचा संकल्प व्यक्त केला.
कार्यक्रम यशस्वीतेसाठी उपस्थित सर्व ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.
आष्टी तालुक्यात संघटनेच्या स्थापनेमुळे कर्मचाऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# ऐसा दादा पुन्हा होणे नाही..!

## पोखरभोशीवासीयांची करुण आर्त हाक......



\प्रतिनिधी प्रांजली काळबेंडे महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे बारामती येथे विमान अपघातदरम्यान दुःखद निधन झाले.हा संपूर्ण महाराष्ट्रावर झालेला मोठा आघात होता.अशावेळी आपल्या लाडक्या नेत्याला अखेरचा निरोप देण्यासाठी सर्व कार्यकर्त्ये आणि समाज प्रत्यक्ष बारामती येथे पोचू शकला नाही,त्यामुळे मौजे पोखरभोशी ता. लोहा जि.नांदेड येथील समाजबांधवांनी दिनांक:०१ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज प्रांगणात आदरांजली कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे माजी तालुकाध्यक्ष तथा विद्यमान उपसरपंच फुलाजी नारायणराव पाटील ताटे,अंकुश शिवाजी ताटे, प्रकाश दत्ता ताटे, शत्रुघ्न बालाजी डांगे, मुरलीधर डांगे, खुशाल ताटे, हनमंत ताटे, संग्राम ताटे,किशन डांगे, नरेंद्र डिगंबर ताटे, भगवान बालाजी डांगे ,आप्पाराव डांगे,भागवत ताटे, पंडित ताटे यांनी आपल्या लाडक्या नेत्याला आदरांजली अर्पण केली. यावेळी अजितदादांचे पोखरभोशी गावात आलेल्या आठवणीना उजाळा देण्यात आला.अशा आपल्या लाडक्या नेत्याला गावकऱ्यांनी जड अंतःकरणाने आदरांजली वाहिली.

# श्री सिद्धेश्वर महाविद्यालयातील प्रयोगशाळा सहाय्यक श्री. मोहन भिसे यांचा सेवा गौरव समारंभ संपन्न

..............................................
माजलगाव प्रतिनिधी दिनांक 03/02/2026
.............................................. येथील भा.शि.प्र संस्थेच्या श्री सिद्धेश्वर महाविद्यालयातील प्रयोगशाळा सहाय्यक श्री. मोहन कोंडीबाराव भिसे यांचा सेवा गौरव सोहळा संपन्न झाला. याप्रसंगी व्यासपीठावर अध्यक्ष म्हणून केंद्रीय कार्यवाह डॉ.हेमंत वैद्य, विशेष उपस्थितीमध्ये भा. शि.प्र.संस्थेचे मुख्य प्रशासकीय समन्वयक प्रा. चंद्रकांत मुळे, तर प्रमुख उपस्थितीमध्ये भा.शि.प्र.संस्थेचे केंद्रीय सदस्य तथा संकुलाचे पालक प्रकाश दुगड, अमरनाथ खुर्पे, उमेश जगताप, महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष अभय कोकड, महाविद्यालय अर्थ समितीचे अध्यक्ष एकनाथ जाधव आणि सत्कारमूर्ती श्री व सौ मोहन भिसे यांची उपस्थिती होती.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ.मुकुंद देवर्षी यांनी करताना म्हटले की, हा क्षण अतिशय भावनिक असतो. आयुष्यातील महाविद्यालयातील काही काळ त्यांची सेवा ही वाखाण्यासारखी आहे. यासाठीच आपली संस्था ही विशेष अशी संस्था आहे कारण इथे कर्मचाऱ्यांचा निवृत्तीनंतर गौरव केला जातो. असे ते म्हणाले. तसेच प्रयोगशाळा सहाय्यक मोहन भिसे त्यांच्या अंगी असणाऱ्या वेगवेगळ्या गुणांचा परिचय त्यांनी दिला. या चाळीस वर्षाच्या काळामध्ये त्यांनी महाविद्यालयातील कोणतेही काम अतिशय चिंतन करून वेगवेगळ्या जबाबदाऱ्या पार पाडल्या. तसेच त्यांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा देखील दिल्या.



संस्थेचे केंद्रीय सदस्य अमरनाथ खुर्पे यांनी मनोगतात म्हटले की, महाराष्ट्रातील काही मोजक्या संस्थांमध्येच शिक्षक कर्मचाऱ्यांच्या सेवेचा गौरव केला जातो. त्यापैकी एक आपली संस्था आहे. श्री. मोहन भिसे यांनी महाविद्यालयातील प्रत्येक काम करताना संस्थेचा व महाविद्यालयाचा आर्थिक फायदा कसा होईल हे पाहिले म्हणजेच यातून त्यांचा समर्पण भाव दिसून येतो. त्यांच्या जीवनामध्ये अतिशय विपरीत परिस्थिती व संकट आले असताना देखील त्यांनी कधी तक्रार न करता समर्पित भावनेने कार्य केले. पारिवारिक जीवन बाजूला ठेवून महाविद्यालयाचे कामाला प्रथम प्राधान्य दिले. व त्यांनी आपली सेवा अतिशय क्षमतेने पूर्ण केली आहे.

केंद्रीय सदस्य तथा संकुलाचे पालक प्रकाश दुगड यांनी श्री. मोहन भिसे यांना भावी आयुष्य व वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी डॉ. महेश देशमुख, प्रा. चिंतामण दीक्षित, कार्यालय अधीक्षक श्री. उत्तरेश्वर आनेवार, त्यांचे जावई डॉ.बोडके, महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष अभय कोकड, संस्थेचे मुख्य समन्वयक प्रा. चंद्रकांत मुळे, यांचे सह काही नातेवाईकांनी मनोगत व्यक्त केले. तसेच नगरसेवक विजय शिंदे, प्रशांत शेटे व त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या नातेवाईकांनी त्यांचा विशेष असा सत्कार याप्रसंगी केला.

सत्काराला उत्तर देताना श्री. मोहन भिसे म्हणाले की, संस्थेने माझ्यावर जो गेल्या 40 वर्षेमध्ये विश्वास दाखवला त्या विश्वासास पात्र ठरण्याचे काम मी प्रामाणिकपणे संस्थेमध्ये केले आहे. व यापुढे देखील करणार आहे. मला कर्मचारी म्हणून काम करत असताना कधीच मला कर्मचारी अशी वागणूक न मिळता संस्था जणू काही माझीच आहे अशी वागणूक नेहमीच मिळत राहिली. त्याबद्दल या संस्थेच्या नेहमीच मी ऋणात राहू इच्छितो. ईश्वराने माझ्यावर पत्नी गेल्यामुळे परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला होता. अशावेळी संस्थेने व महाविद्यालयाने मला ममतेची साथ देऊन आपलेसे केले. याप्रसंगी त्यांनी संस्था व महाविद्यालयाचे ऋण व्यक्त केले.

सुरुवातीस उपप्राचार्य डॉ. गजानन होन्ना यांनी श्री. मोहन भिसे यांच्या कार्याचा गौरव म्हणून सन्मान पत्राचे वाचन केले.

अध्यक्षीय समारोप प्रसंगी केंद्रीय कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य म्हणाले की, अतिशय निष्ठेने केलेले श्री. मोहन भिसे यांचे कार्य व त्याची पावती आजच्या भव्यदिव्य सोहळ्यातून दिसत आहे. सामान्यतला सामान्य माणूस परिवार क्षेत्रामध्ये आल्यानंतर तो आपला होतो व हे संकुल व महाविद्यालय आपलेच मानून कार्य करतो. कधीही कामाची तक्रार न करता प्रत्येक काम हे माझे आहे अशी जबाबदारी सांभाळून जेव्हा कार्य करतो तेव्हाच तो खऱ्या अर्थाने कार्यकर्ता म्हणून या संस्थेमधून सेवानिवृत्त होतो. त्यामुळेच त्यांचा आपण याप्रसंगी सेवा गौरव करतो. याप्रसंगी त्यांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा देऊन त्यांच्या भविष्यातील सर्व इच्छा आकांक्षा पूर्ण पूर्ण होवोत अशा सदिच्छा त्यांनी याप्रसंगी दिल्या.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. लक्ष्मीकांत सोन्नर यांनी केले. मान्यवरांचे आभार स्टाफ अकॅडमीचे प्रमुख डॉ. नामदेव हेडे यांनी मानले.

या कार्यक्रमाचे आयोजन स्टाफ अकॅडमीचे डॉ. जिजाराम बागल व डॉ. नामदेव हेडे यांनी केले होते. या कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ. गजानन होंन्रा, डॉ.युवराज मुळये, प्रा. अंकुश साबळे, पर्यवेक्षक प्रा.परमेश्वर खेत्री, कार्यालय अधीक्षक श्री. उत्तरेश्वर आनेवार यांचेसह सर्व प्राध्यापक कर्मचारी, नातेवाईक, जावई प्राध्यापक, आप्तेष्ट, मित्रपरिवार विद्यार्थी - विद्यार्थिनी यांची उपस्थिती होती.

# युवकांनो जीवनाकडे खेळ म्हणून पाहू नका - भास्कर भैय्या मगर

..............................................
माजलगाव प्रतिनिधी दिनांक 02/02/2026
..............................................
युवकांनो जीवनाकडे खेळ म्हणून पाहू नका असे प्रतिपादन आर्ट ऑफ लिविंगचे सेलू येथील वरिष्ठ प्रशिक्षक भास्कर भैय्या मगर यांनी केले. ते श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात आयोजित वार्षिक स्नेहसंमेलनाच्या बक्षीस वितरण कार्यक्रमात बोलत होते. अध्यक्षस्थानी स्थानिक शैक्षणिक संकुलाचे पालक तथा केंद्रीय कार्यकारणी सदस्य प्रकाश दुगड तर मंचावर स्थानिक उपस्थित होते. तर मंचावर महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष अभय कोकड व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी, स्नेहसंमेलन प्रमुख डॉ.कमलकिशोर लड्डा, सहप्रमुख प्रा.शंकर राठोड उपस्थित होते.

पुढे बोलताना ते म्हणाले की, विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला पाहिजे यासाठी आर्ट ऑफ लिविंग आपणास जीवन जगण्याची कला शिकवते. श्री. श्री. रविशंकर यांचे विचार हे जीवनाला दिशा देणारे आहेत. मन, शरीर हे शरीराच्या सोबत मन सतत असेल तर जीवन





जगण्यास आपण लायक आहोत. म्हणून या जीवनाच्या वळणावर आपण अशा कार्यक्रमातून प्रेरणा घेऊन मोठे झाले पाहिजे. ज्या वाईट गोष्टींचे परिणाम तुम्हाला भविष्यात भोगावे लागतात त्या गोष्टी आत्ताच आपण टाळल्या पाहिजेत. रोज प्रत्येक दिवशी आपल्याला झोकून देऊन काम करायला हवे. तुम्ही जीवनात यश निर्माण केले तर ते तुमच्या आई-वडिलांचे व शिक्षकांचे नाव उज्वल कराल. जीवनाकडे खेळ म्हणून पाहू नका. आयुष्यात अनेक संकट आणि अडचणी येतात पण त्यावर मात करून तुम्ही तुमचे जर जीवन जगत राहिला तर तुम्ही नक्कीच आनंदी आणि उत्साही जीवन जगू पहाल. असे विचार त्यांनी विद्यार्थ्यांसमोर व्यक्त केले.

या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना स्थानिक संकुलाचे पालक तथा केंद्रीय कार्यकारणी सदस्य प्रकाशभाऊ दुगड म्हणाले की, विद्यार्थ्यांचे मन, मेंदू, आणि मनगट बळकट करण्यासाठी क्रीडा विभागाच्या माध्यमातून वेगवेगळ्या स्पर्धा या वार्षिक स्नेहसंमेलनामध्ये आयोजित केल्या होत्या. फक्त विद्यार्थी चार भिंतीच्या आतमध्ये शिकत असताना तो फक्त अभ्यासातच प्रगत न होता वेगवेगळ्या कलागुणांना त्यांच्या वाव मिळावा म्हणून हे वार्षिक स्नेहसंमेलन आयोजित केले जाते. या माध्यमातून तुमचे नेतृत्व गुण विकसित होतात शरीर व प्रकृती उत्तम राहते. म्हणून तुम्ही या स्नेहसंमेलनाच्या माध्यमातून ज्या ज्या तुमच्या उपजत कला होत्या त्या तुम्ही या माध्यमातून विकसित करून पुढील आयुष्यात त्या कलागुणांच्या जीवावरच आपले आयुष्य उज्वल करताल अशा शुभेच्छा त्यांनी याप्रसंगी दिल्या.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्नेहसंमेलन प्रमुख डॉ. कमलकिशोर लड्डा यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. ज्ञानेश्वर गवते व डॉ. विकास बोरगावकर यांनी केले. तर आभार स्नेहसंमेलन सहप्रमुख प्रा.शंकर राठोड यांनी मानले. हे वार्षिक स्नेहसंमेलन यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक कर्मचारी तसेच चतुर्थ श्रेणी कर्मचारी यांनी विशेष मेहनत घेतली.

## नगर परिषदेच्या दुर्लक्षामुळे कुत्र्यांचा कहर; कार्यालयासमोरच ८ वर्षांच्या चिमुकल्यावर हल्ला”



करीम लाला जालना जिल्हा प्रतिनिधि भोकरदन शहरात भटक्या कुत्र्यांचा वाढता उपद्रव आता जीवघेणा ठरत आहे. आज भोकरदन नगर परिषदेच्या कार्यालयासमोरच साई गजानन राऊत या अवघ्या ८ वर्षांच्या बालकावर कुत्र्याने हल्ला करून चावा घेतल्याची धक्कादायक घटना घडली आहे. साई गजानन राऊत यांना नगर परिषदेच्या कामानिमित्त बाहेर उभे करून गजानन राऊत हे आत कार्यालयीन कामासाठी गेले असताना, काही क्षणांतच कुत्र्याने बालकावर हल्ला केला. विशेष म्हणजे ज्या नगर परिषदेवर संपूर्ण शहराच्या स्वच्छतेची, सुरक्षिततेची आणि भटक्या कुत्र्यांच्या बंदोबस्ताची जबाबदारी आहे, त्याच कार्यालयासमोर ही घटना घडणे अत्यंत संतापजनक आहे. हल्ल्यानंतर जखमी बालकास तातडीने ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत. सुदैवाने मोठी जीवितहानी टळली असली तरी या घटनेने पालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शहरात यापूर्वीही कुत्र्यांच्या हल्ल्याच्या घटना घडूनसुद्धा नगर पालिका व संबंधित ठेकेदार (बॉडी) यांनी अद्याप कोणतीही ठोस कारवाई केलेली नाही. किती वेळा अशा घटना घडल्यावर प्रशासनाचे लक्ष वेधले जाणार? एखादी गंभीर दुर्घटना घडल्यावरच का हालचाल होणार? असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. या घटनेची संपूर्ण जबाबदारी भोकरदन नगर परिषद व कुत्रे नियंत्रणाची जबाबदारी असलेल्या बॉडीवरच येते, अशी तीव्र प्रतिक्रिया शहरातून व्यक्त होत आहे. तात्काळ भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त न केल्यास जनतेचा रोष उग्र होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# बीड हादरलं: रायमोहात दगडाने ठेचून तरुणाचा खून

## पेंटींग काम करणाऱ्या तरुणाची निर्घुन हत्या, पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवली

शिरुरकासार/प्रशांत बाफना डोके दगडाने ठेचून युवकाचा निर्घुन खून केल्याची घटना रायमोहा (ता. शिरुर कासार) येथे सोमवारी (दि.2) उघडकीस आली. चांद अल्हाहुद्दीन तांबोळी वय 30 वर्षे रा. रायमोहा असे खून झालेल्या व्यक्तीचे नाव असून तो पेंटींग व्यवसाय करत असल्याची माहिती आहे. पाटोदा पोलिस ठाण्यात रात्री उशीरापर्यंत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती.
पोलिस सुत्राकडून मिळालेल्या माहितीनुसार, रायमोहा येथील चांद अल्हाहुद्दीन तांबोळी हा पेंटींग व्यवसाय करत होता. रविवारी (दि.1 फेब्रूवारी) सकाळी बीडला जातो म्हणून तो मालकीच्या मोटारसायकल वरुन बीडला गेला. सायंकाळी बीडहून परत घरी आल्यानंतर कामानिमीत्त निरगुडी (ता. पाटोदा) येथे जाऊन येतो असे सांगून घरातून निघून गेला. नातेवाईकांनी रात्री मोबाईलवरुन संपर्क केला असता मी हिवरसींगा येथे आलो असल्याचे सांगितले.
मात्र रात्री 7:45 वाजता खोकरमोहा (ता. शिरुर कासार) शिवारातील वाल्मिक मिसाळ यांचे हॉटेल येथे गाडी लावली आहे ती घरी घेवून जाण्यास नातेवाईकास सांगितले. त्यानंतर नातेवाईकांनी वारंवार त्याच्या मोबाईलवर संपर्क केला असता त्याने प्रतिसाद दिला नाही. अशी फिर्याद खलील अल्हाहूद्दीन तांबोळी (वय 54 वर्षे) यांनी शिरुर कासार पोलिस



ठाण्यात पहाटे 3:58 वाजता दिली.
नातेवाईकांनी पाहूण्यांसह मित्रांकडे चांदचा शोध घेतला पण तो कुठेच मिळून आला नाही, चांद कोठेच मिळून येत नसल्याने नातेवाईकांनी पहाटे शिरुर कासार पोलिस ठाणे गाठून मिसिंगची फिर्याद दिली. त्यानंतर सकाळी रायमोहा शिवारात राजूरी नवगन-चिंचपूर मार्गाच्या बाजूला डोंगरदेवी संस्थाच्या जवळ खड्यात एक व्यक्ती पडल्याच्या माहितीवरुन पाटोदा पोलिस (रायमोहा चौकी) घटनास्थळावर पोहोचले. पोलिसांनी चांदच्या नातेवाइकांशी संपर्क करून अढळून आलेली व्यक्ती चांद असल्याची खात्री केली.

दरम्यान, युवकाच्या डोक्याला मागील बाजूस मोठी जखम अढळून आली. मयताचे कपडे पूर्णत: रक्ताने माखलेले होते. चांदचा इतर कुठेतरी खून करून त्याचे प्रेत येथे फेकून दिल्याचे प्रत्यर्शी दिसून आले. महामार्गापासून ते खड्ड्यापर्यंत फरफटत नेल्याचे व्रण जमिनीवर दिसून आले. माणसीक विकृतीने चांदचा अत्यंत निर्घुनपणे खून करून प्रेत महामार्गाच्या बाजूला दगडाच्या आडूशाला फेकून पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न केला. रायमोहाच्या ग्रामीण रुग्नालयात शवविच्छेदन करून पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. रात्री उशीरा पर्यंत पाटोदा पोलिस ठाण्यात अज्ञात आरोपीच्या विरोधात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती.

## राघव सवणे यांचा वाढदिवस विवीध सामाजिक उपक्रमांनी साजरा







माजलगाव, दि. 2 प्रतिनिधी: येथील सामाजिक कार्यकर्ते राघव सवणे यांचा वाढदिवस अनिलराधे कांबळे मित्र मंडळाच्या वतीने विवीध सामाजिक उपक्रमांनी दि. 2 फेब्रुवारी 2026 रोजी उत्साहात साजरा करण्यात आला. सामाजिक कार्यकर्ते राघव सवणे यांचा वाढदिवस अनिलराधे कांबळे मित्रमंडळाच्या वतीने दरवर्षी पेक्षा यंदा वाढदिवस विशेष पध्दतीने साजरा करण्याचे ठरविले व त्यांनी शहरातील मुकबधिर शाळेतील विद्यार्थ्यांना एक दिवसांचे भोजनदान देण्यात आले तर उन्हापासुन संरक्षण व्हावे याकरीता टोप्यांचे वाटप देखिल करण्यात आले. त्याचबरोबर पसायदान सेवा प्रकल्प ढेकणमोहा ता. वडवणी जि. बीड येथे फळांचे व रेशन किटचे वाटप करण्यात आले. यावेळी उपसरपंच तथा उसतोड कामगार सामाजिक प्रतिष्ठाणचे अध्यक्ष अनिलराधे कांबळे, राष्ट्रीय उपाध्यक्ष बबलु सोळंके, उसतोड कामगार संघटनेचे माजलगाव तालुकाध्यक्ष मयुर कांबळे, वैभव बापमारे, तालुका उपाध्यक्ष अमोल राठोड, बाळुभाउ सरवदे, महादेव सवणे, परशुराम सवणे, मुकेश चव्हाण, समीर पठाण, रंजित लोखंडे, गोविंद अनभुले, केतन समाले, महेश पाईक, मिरगेश साळवे, ईरफान पठाण, सचिन राठोड, अमित साळवे, प्रविण कांबळे, युवराज कांबळे, विक्रांत कांबळे, चेतन अलझेंडे, अजय डोईफोडे यांचेसह बाबा सोनवणे मित्र परिवाराच्या सदस्यांची उपस्थिती होती.

## लोककलावंत पै. मजनूभाई शेख स्मृती गौरव पुरस्कार सोहळ्यात ग्रामीण कवी श्रीराम वि. घडे यांना राज्यस्तरीय 'युवा प्रेरणा पुरस्कारने सन्मानित





अहिल्या नगर श्रीरामपूर (जि. अहिल्या नगर) येथील दोस्ती फाउंडेशनच्या वतीने आयोजित लोककलावंत पै. मजनूभाई शेख स्मृती गौरव पुरस्कार सोहळ्यात परभणी जिल्ह्यातील मौजे डुमनरवाडी येथील आणि सध्या सध्या तळेगाव दाभाडे ता. मावळ जिल्हा. पुणे येथील ग्रामीण कवी मा. श्रीराम विध्यासागर घडे यांना राज्यस्तरीय युवा प्रेरणा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

याच पुरस्कार सोहळ्यात सर्व मान्यवर आणि सर्व चित्रपट कलाकार यांच्या हस्ते शापित ग्रंथ या लघुचित्रपटाचे प्रमोशन करण्यात आले आहे. चित्रपट दिग्दर्शक प्रमोद सूर्यवंशी,आमदार च्या भूमिकेत काम करणारे रज्जाक भाई शेख, आमदार च्या पत्नी म्हणून काम करणाऱ्या स्मिता देशमुख मॅडम हवालदार या भूमिकेत काम करणाऱ्या वंदना नागणे मॅडम आणि श्रीराम घडे हे कलाकार उपस्थित होते. ग्रामीण कवी श्रीराम घडे यांनी शापित ग्रंथ या लघुचित्रपटात हवालदार शिंदे यांची भुमिका साकारली आहे.

तसेच मराठी साहित्य क्षेत्रात सातत्यपूर्ण लेखन, सामाजिक विषयांवरील परखड मांडणी व युवा कविना मार्गदर्शन करणारे यांच्या साहित्यसेवेसाठी कवी श्रीराम घडे यांना युवा प्रेरणा हा पुरस्कार देण्यात आला आहे. या पुरस्कार सोहळ्या साठी कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. महावीरसिंग चौहाण, उदघाटक राणीताई सोनवणे,संदीप कुमार बोरकर,करण नवले, नानासाहेब डोंगरे,सुनीता वाळुंज,मोहिनीराज होन, प्रमोद सूर्यवंशी(शापित ग्रंथ चित्रपट दिग्दर्शक निर्माता), आणि स्वेता सावंत हे मान्यवर उपस्थित होते. आरटीओ च्या अधिकारी राणीताई सोनवणे यांच्या हस्ते ग्रामीण कवी श्रीराम घडे यांना युवा प्रेरणा पुरस्कार देण्यात आला. हा पुरस्कार दि. ३१ जानेवारी रोजी श्रीरामपूर येथे मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला.

या निवडीबद्दल साहित्यिक, सामाजिक व फिल्म क्षेत्रातून,ग्रामीण कवी श्रीराम घडे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## ईगलवूड शाळेचे दोन दिवसीय वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न









माजलगाव / प्रतिनिधी
ईगलवूड इंग्लिश स्कूल येथे शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ चे दोन दिवसीय वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात पार पडले. कार्यक्रमाची सुरुवात दोन्ही दिवशी दीपप्रज्वलन व सरस्वती प्रतिमापूजनाने करण्यात आली.
पहिल्या दिवशी कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवर पाहुण्यांची उपस्थिती लाभली. यामध्ये कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान
डॉ.सुशील भैय्या लोढा यांनी भूषविले तर श्री.दत्ता डाके, श्री.ज्ञानेश्वर मेंडके, मा.खलील पटेल, श्री.हरिभाऊ सोळंके, श्री.अरुण इंगळे, श्री.जुगलकिशोर नावंदर, श्री.सुनील नाना तौर, सौ.रेश्मा मेंडके, श्री. सुरेश एरांडे, श्री.महेंद्र मस्के, श्री.तानाजी सिरसट, श्री.गोविंद इतापे, मा.इम्रान खान, अॅड.काझिम मनसबदार, श्री.पृथ्वीराज तट , अॅड.शैलेश पवार आदी मान्यवर उपस्थित होते.
दुसऱ्या दिवशीही विविध क्षेत्रातील मान्यवर पाहुण्यांनी कार्यक्रमास उपस्थिती लावली. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षीय स्थान डॉ.शरद पवार यांनी भूषवले. तर पाहुणे म्हणून श्री.दीपक जाधव, श्री.राहुल लंगडे, श्री.शरद यादव, सौ.सुचिता होके, सौ.वनिता फुलगे, अॅड.सुलभा देशमुख, श्री.भागवत भोसले, श्री. नितीन काळे, डॉ.शैलेश पाठक, श्री.सुहास बोराडे, श्री. अन्वर शेख आदी मान्यवर उपस्थित होते.
दोन्ही दिवशी मान्यवर पाहुण्यांनी आपल्या भाषणातून शाळेच्या शैक्षणिक गुणवत्ता, विद्यार्थ्यांमधील संस्कार, शिस्त व आत्मविश्वासाचे कौतुक केले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले.
पहिल्या दिवशी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु.गुंजन जोशी आणि आर्या खुळे आणि इतर विद्यार्थ्यांनी तर दुसऱ्या दिवशी काळे वरद आणि गायकवाड यशश्री व इतर विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक विभाग प्रमुख अर्जुन तौर सर यांच्या मार्गदर्शनाखाली अत्यंत प्रभावीपणे केले.





दोन्ही दिवशी शाळेच्या वार्षिक कामकाजाचा आढावा प्राचार्य सत्यजित कांजाळकर व उपप्राचार्य प्रणिता कांजाळकर यांनी घेतला. संस्थेचे सचिव डॉ.शरद पवार यांनी शाळेच्या विकासात्मक वाटचालीचे कौतुक केले. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या नृत्याविष्कारांनी प्रेक्षकांची मने जिंकली. विविध गीतांवर आधारित समूह नृत्य व लोकनृत्यांना उपस्थितांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.
कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ.अर्चना पवार, शाळा व्यवस्थापन, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालकांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## पोरांनो, मोर्चे दंगलीच्या भानगडीत पडू नका, तुमचा वापर फक्त 'यूज आणि थ्रो'साठी होतोय; इंदुरीकर महाराज काय म्हणाले...


अहिल्यानगर / तरुणांसह शेतकऱ्यांच्या पोरांना प्रसिद्ध कीर्तनकार इंदुरीकर महाराजांनी एक तळमळीचं आवाहन केलं आहे. पोरांनो, मोर्चे आणि दंगलीच्या भानगडीत पडू नका, तुमचा वापर फक्त 'यूज आणि थ्रो'साठी होतोय असं इंदुरीकर महाराज म्हणाले. आज प्रत्येक कामामध्ये पोलीस व्हेरिफिकेशन आवश्यक आहे, अशा दंगलीत तुम्ही दिसला तर त्यासाठी 10 वर्षांची शिक्षा आहे असंही इंदुरीकर महाराज म्हणाले.

बारावी आणि दहावीची परीक्षा तोंडावर आल्या आहेत. मुले काहीच अभ्यास करेनात. राज्यातील सर्व शाळांत परीक्षा काळात मोबाईलवर बंदी घालावी अशी मागणी इंदुरीकर महाराजांनी केली आहे. मी दीड वर्षे शेती करून पाहिली, काहीही खरं नाही. इतर काहीही करा, पण भाजी आणि किराणा वरच्यावर भरता येईल असं काहीतरी करा असं आवाहन इंदुरीकर महाराजांनी केलं.

आजकाल शाळेतली पोरं रम्मी खेळून भिकारी झाले आहेत. पोरं अभ्यास करणारे नाही. अभ्यास हा विषय त्यांनी सोडून दिला. परीक्षा आली की खिडकीतून चिठ्ठी येते अशा शब्दात इंदुरीकर महाराजांनी टीका केली.

### तुमचा वापर यूज अँड थ्रो

आजकाल पेनमध्ये कॅमेरे आहेत. टपरी पेटवाताना किंवा दंगलीत तुम्ही कुठे दिसले तर, 10 वर्षांची शिक्षा आहे.



कारण, आतापर्यंत दंगलीमध्ये गरिबांची पोरं आत गेली आहेत, मोठ्या श्रीमंतांची पोरं नाहीत आणि ते कधी जाऊ देणारही नाहीत. ते तुमचा वापर फक्त 'युज अँड थ्रो' म्हणून करणार, असेही कीर्तनकार इंदुरीकर महाराजांनी ठणकावून सांगितलं आहे. आज कोणतंही काम करायला पोलीस व्हेरिफिकेशन दाखला लागतो. म्हणून सर्व पोरांच्या पाया पडतो, दंगलीच्या भानगडीत पडू नका, असंही इंदुरीकर महाराजांनी म्हटलंय.

### मुली दरिद्री मुलांच्या मागे

इंदुरीकर महाराज म्हणाले की, "मुलगी हुशार मुलावर कधीही प्रेम करत नाही, ती कधीही चांगल्या मुलाच्या नादी लागत नाही. मुलगी ही दरिद्री मुलाच्याच नादाला लागते, त्याच्यावरच प्रेम व्यक्त करते. विहिरीवरच्या मोटारी चोरणारे, गाड्यांचे पार्ट चोरतो अशा मुलांच्या मागे मुली लागतात. एखादी मुलगी दरिद्री मुलाबरोबर पळून गेली तर ती आयुष्यात कधीही सुखी होत नाही. तिने सुखी असल्याचं सांगावं, मी तिच्या घरी सहा महिने भांडी घासतो. जिने आई-बापाची मान खाली केली ती मुलगी आयुष्यात कधीही सुखी होत नाही."

मी काहीही केलं तर लोक शिव्या देतात, मी फक्त सत्य बोलतो तरी लोक टीका करतात असं इंदुरीकर महाराज म्हणाले. 31 वर्षे आयुष्य लोकांच्या शिव्या खाण्यात गेलंय, मग थोड्यासाठी कशाला बंद करायचं असं म्हणत यापुढेही आपण कीर्तन सुरू ठेवणार असल्याचं इंदुरीकर महाराजांनी म्हटलंय

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com